

## सायबर सुरक्षा जनजागृती

मॉडर्न कॉलेज ऑफ कॉमर्स आणि कॉम्पुटर स्टडीज महाविद्यालयात 'सायबर वॉरिवर क्लब' स्थापन केला आहे. त्याअंतर्गत विद्यार्थी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अशी जनजागृती मोहीम राबवणार आहेत. वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन लहान मुलांना सायबर सुरक्षेचे धडे देणार असून, नागरिकांमध्येही



सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करणार आहेत. चार विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर म्हणून निवड केली. यात निखिल नेहेते, पालवी राऊत, श्रद्धा धनावडे, उमाकांत बारडवार यांचा समावेश आहे. प्राचार्य डॉ. सदाशिव शिरगावे, उपप्राचार्य डॉ. प्रसन्न चव्हाण, अश्विनी केंडे, क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, अजय शिर्के यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कॉलेज कट्टा

अँड
तील
ठपास
ड करू
यांनी मांडली.
र्थ्यांनी सहभाग
ागवड केली.
रून, जोपासना
क्रम अधिकारी
डॉ. सदाशिव

# सायबर वॉरियर्स क्लबचे उद्‌घाटन

**अथर्व शिंदे/स्नेहा आढळराव (डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालय, पिंपरी)**

पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील संगणक विज्ञान विभाग आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्यातर्फे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रम राबविण्यात आला. त्यासाठी सायबर वॉरिअर्स विद्यार्थी क्लबची स्थापना केली. त्यात ३० विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. क्लबची उद्दिष्टे आणि दृष्टिकोन निश्चित करून अंतिम निर्णय घेणे, उपक्रमातील सर्व प्रकारचा डेटा हाताळणी आणि अहवाल तयार करणे; लाइव्ह सत्रे आणि सादरीकरण सुरळीतपणे हाताळणे; सर्व उपक्रम व कार्यक्रमांना सोशल मीडियावर प्रोत्साहन देऊन लोकांपर्यंत पोहोचविणे अशा जबाबदारींचे वाटप करण्यात



आले. त्यासाठी अध्यक्ष पायल यादव, सचिव कनिका, समुदाय संचालक जान्हवी जगदाळे, जनसंपर्क व सामाजिक माध्यम संचालक गौरांग मराठे यांची निवड केली. प्राचार्य डॉ. रणजित पाटील, प्रा. डॉ. सुजाता पाटील, प्रा. विद्या शिंदे यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, सचिव डॉ. सोमनाथ पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.